सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता




ऑक्टोबर-२०२२ वर्ष -३, अंक-१२

कार्यालय - संत एकनाथ नगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७

## कै. मा. ग.गोगटे व्याख्यानमाला वर्ष दुसरे संपन्न


३ ऑक्टोबर रोजी सेवक संघातर्फे कै. मा. ग. गोगटे व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफण्यात आले. वर्षी मा. डॉ. श्री अरविंद कुमार झा (से.नि. प्रधान मुख्य वन संरक्षक) यांचे सामुहिक वन हक्क या राष्ट्रव्यापी ज्वलंत विषयावर अभ्यासपूर्ण व सर्वांना मार्गदर्शक व्याख्यान वनभवन, पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानास अनेक पुणे स्थित अनेक जेष्ठ सेवानिवृत्त वनाधिका-यांनी समक्ष उपस्थित राहून शोभा आणली.







**सेवक संघाच्या सर्व सदस्यांना दिवाळी सणासाठी हार्दिक शुभेच्छा. हे वर्ष आपणास स्वास्थ्यपूर्ण व आनंदी जावो**




## पाणलोट क्षेत्रात उपचार दिलेल्या ४६ स्थळांचे मूल्यांकन

सेवक संघाचे जेष्ठ सदस्य व अनेक कामांचे समन्वयक, मार्गदर्शक श्री. पत्की यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रातील धुळे, ठाणे व नागपूर वनवृत्तातील पाणलोट क्षेत्रात उपचार दिलेल्या ४६ स्थळांचे मूल्यांकनासाठी आदेश अपेक्षित आहेत.

## सा.व. विभाग कामांचे मुल्यांकन

बांधावरील लागवड आणि गट लागवड मुल्यांकनासंबंधी सा. व. विभागाशी श्री. पत्की सर वाटाघाटी करीत असून त्यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत जसे की, जिल्हावार लाभार्थींची संख्या दिलेली आहे, परंतु त्यातील किती टक्के करावयाची आहे हे नमूद केलेले नाही. लाभार्थींची निवड मूल्यांकनासाठी बांधावर लागवड केलेले आणि गट लागवड केलेले लाभार्थी यांची तालुकावार आणि गाववार नावासहित यादी दिलेली नाही.

हा तपशील प्राप्त झाल्यानंतर मूल्यांकनाचे दरपत्रक तयार करणे शक्य होईल, अशी संपूर्ण माहीती पाठविणेची विनंती केली आहे.

बहुतेक जास्त मान्सून प्रदेशातील कामे सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात आणि कमी मान्सून प्रदेशातील कामे जालना जिल्ह्यात आहेत. या जिल्ह्यातील दोन तालुक्यात मूल्यांकन केल्यास, कमीत कमी कालावधीत क्षेत्रीय भेटी देऊन, मूल्यांकनाचा अंदाज बांधता येईल. त्या दृष्टीने विचार करून, अटी व शर्तीत सुधारणा व्हावी असा प्रस्ताव दिला आहे. मूल्यांकनासाठी शासन मंजूर अनुदानाची रक्कम कळविल्यास, मूल्यांकनाची टक्केवारी ठरविण्यास उपयुक्त ठरेल. उचीत कार्यवाहीची विनंती केली आहे.

## सेवक संघाची कायदे विषयक प्रशिक्षण देण्यासाठी निवड

वनविकास महामंडळातील वन अधिकारी व कर्मचारी यांना सेवक संघाद्वारे कायदेविषयक प्रशिक्षण देण्यासाठी निवड झाली असून तसे १९ ऑक्टोबर २०२२ चे पत्र प्राप्त झाले आहे. त्याअंतर्गत नागपूर व चंद्रपूर प्रदेशातील वनाधिकारी कर्मचाऱ्यांना वन प्रशासन व विकास व्यवस्थापन प्रबोधिनी चंद्रपूर येथे, तर नाशिक प्रदेशातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांना वन प्रशिक्षण संस्था शहापूर येथे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण शिबिरास प्रत्येक वन प्रकल्पातून २ सहा. व्यवस्थापक, ४ वनपरिक्षेत्र अधिकारी, ६ वनपाल व १३ वनरक्षक असे २५ प्रशिक्षणार्थी

विजया दशमीच्या दिवशी शस्त्रांचा वार करुन नष्ट करण्याची दुष्ट प्रथा बंद करणे आवश्यक आहे. शमी वृक्षा समान पानाचे आकार असलेले अंजन, कचनार यावर सुद्धा कुऱ्हाड चालत आहे.

अमरावती शहरातील नवीन अमरावती रेल्वे स्थानकाजवळ असलेले ४ कचनार वृक्ष या अनिष्ट सोने लुटण्याच्या प्रथेतून मुक्त व्हावे यासाठी सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ अमरावती यांनी स्थानिक लोकांचे सहभागातून दसऱ्या पूर्वीचा व दसऱ्याचे दिवशी या ४ वृक्षाचे संरक्षण करण्याचे ठरविले. आज सायंकाळी पाने तोडणाऱ्या इसमाना पिटाळून लावले. मॉर्निंग व इव्हीनिंग वॉक ला रेल्वे परिसरात जाणाऱ्या सर्व सद्गृहस्थानी मदत केली. त्यांचे आभार व अभिनंदन .

## कार्यकारी मंडळ बैठक वृत

या महिन्यात बैठक झाली नाही.

## बिबट्या आणि माणूस संघर्ष – पर्यायी उपाययोजना - भाग 3

* प्रभाकर कुकडोलकर



पण उसाची समस्या ही आहे की उसतोडीच्या वेळी बिबटे आणि त्यांची पिले उघडयावर पडतात आणि संघर्ष होतो. मनुष्यहानी झाली तर १५ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान दिले जाते. पाळीव जनावर मारले तर ६५ हजारापर्यंत नुकसान भरपाई दिली जाते. तरी जीवाच्या भीतीमुळे लोक बिबटयाला स्वीकारायला तयार नाहीत शिवाय ती वेळेवर दिली जात नसल्याने लोकांमध्ये असंतोष आहे. त्याहीपेक्षा जीवितहानी झाल्यानंतर लोक अधिक प्रक्षोभक होतात. ही वस्तुस्थिती आहे.अशी परिस्थिती हाताळ - ण्यातील वन विभागाचे अपयश बिबाटयांसाठी समस्या ठरत आहे. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना अशी नाजूक परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण देऊन सक्षम केल्यास आणि राजकिय पुढाऱ्यांनी प्रश्नाचे गांभीर्य जाणून घेऊन लोकांची समजूत घातल्यास आताच्या परिस्थितीत थोडाफार फरक निश्चित पडेल.पण प्रश्न पूर्णपणे सोडवण्यास त्याचा उपयोग नाही. अशा परिस्थितीत बिबटयांच्या सातत्याने वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवणे हा एकमेव उपाय आहे. वन विभागाला त्याची जाणीव असल्याने बिबटयांची नसबंदी करण्याची घोषणा वन विभागाने दोन वर्षापूर्वीच केली आहे. घोषणा करणे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. घोषणा केल्यानंतर त्यासाठी आवश्यक तयारी वन विभागाने केलेली नाही.त्यासाठी त्यांना आवश्यक निधीही प्राप्त झालेला नाही. मुळात या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी त्याला संशोधनाचे पाठबळ हवे ते आज तरी वन विभागाकडे नाही.त्यामुळे वन विभाग बिबटयांच्या बाबतीत ठोस कार्यवाही करतांना दिसत नाही.ही परिस्थिती आणखी चार-पाच वर्ष अशीच राहिल्यास बिबट-मानव संघर्षाचा प्रश्न आक्राळविक्राळ स्वरूप धारण करेल. तसे झाले तर लोकांचा वन विभागांवरचा विश्वासच उडून जाईल. मग चिघळलेला प्रश्न हाताळणे त्यांच्यासाठी अधिकच अवघड होऊन बसेल. प्रश्न असा आहे की ही समस्या आपण आता कशी सोडवणार आहोत? या प्रश्नाचे उत्तर केवळ वन विभागालाच नव्हे तर आपणा सर्वांना अधिक वेळ न दवडता शोधावयाचे आहे.


माझ्या मते आपल्याला हा प्रश्न तातडीने सोडवावयाचा असेल तर आपण बिबटयासंदर्भात काही धोरण निश्चित करावे लागेल. जे क्षेत्र बिबटयाच्या नैसर्गिक अधिवासाचा भाग नाही अशा क्षेत्रात बिबटया आला तर त्याला तेथे राहू द्यायचे की ताबडतोब पकडून त्याची विल्हेवाट लावावयाची हे ठरवणे हा या धोरणाचा सर्वात महत्वाचा भाग असेल.त्यासाठी गरज पडल्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मध्ये बदल करुन अशा बिबटयांना ठार करण्याचे अधिकार स्थानिक वन अधिकाऱ्याला द्यावे लागतील.बिबट प्रवण क्षेत्र 'संवेदनशील क्षेत्र' म्हणून घोषित करुन या क्षेत्रासाठी काही विशेष सवलती तातडीने जाहिर कराव्या लागतील. उदाहरणार्थ घरे आणि गोठे बंदिस्त करण्यासाठी आर्थिक अनुदान देणे,२४ तास विजेचा पुरवठा करणे,गस्तीपथकामध्ये स्थानिक लोकांना रोजगार देणे इत्यादी. त्याच बरोबर जे बिबटयाचे नैसर्गिक अधिवास आहेत तेथे बिबटयांच्या वाढत्या संख्येवर संशोधनातून सातत्याने लक्ष ठेऊन त्यांचा उपद्रव होणार नाही इथ पर्यंतच त्यांची संख्या मान्य पध्दतीनुसार नियंत्रित करणे

उपस्थित राहणार असून प्रत्येक महिन्यात एक प्रशिक्षण शिबिर होणार आहे. चंद्रपूर येथे ९ शिबिरे व शहापूर येथे २ प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. त्या संबंधात तारखा निश्चितच करण्यात येणार आहे. सेवक संघाच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी आहे

### श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे हस्ते डॉ. शेषराव पाटील यांच्या कविता संग्रहाचे विमोचन

"सृष्टीचे जीवन गाणे" या कविता संग्रहाचे माननीय वनमंत्री यांच्या हस्तेभूषण दिनांक १३ सप्टेंबर रोजी मुंबई डॉ. शेषराव हि. पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जैव विविधता मंडळ यांच्या "सृष्टीचे जीवन गाणे" या कविता संग्रहाचे सह्याद्री विश्रामगृह, मुंबई येथे मा. मंत्री, वने सांस्कृतिक कार्य व मत्स्य विकास महाराष्ट्र राज्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे असते विमोचन करण्यात आले. यावेळी वन विभागाचे प्रधान सचिव श्री. बी वेणू गोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बलप्रमुख) डॉ. वाय. एल. पी. राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्री सुनील लिमये, व इतर मान्यवर हजर होते. या कविता संग्रहात निसर्ग, वने, वन्यजीव, जैवविविधता, शेती, प्रदूषण अशा विविध विषयावर १०८ कवितांचा समावेश आहे. या संग्रहास अरण्य ऋषी श्री. मारुती चित्तमपल्ली यांची प्रस्तावना लाभली आहे. निसर्गाचा वेध घेणाऱ्या या कविता वाचकांना निसर्गाबद्दल आवड निर्माण करतील व निसर्गाकडे आणि निसर्गातील घटनांकडे डोळे उघडून पाहायला लावतील यात शंका नाही. माननीय मंत्री यांनी या कविता संग्रहाबद्दल डॉ. पाटील यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.





त्यावर अभिनंदन करीत श्री.पत्की म्हणाले, "कवीमन असल्याने सृष्टीच्या कळ्या उमलल्या शेषरावांच्या लेखणीतून"

काही निवडक कविता सेवक वार्ता अंकातून प्रकाशित करण्यात येतील.

## धुळे शाखा विशेष उपक्रम

### नंदुरबार वन विभाग सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत अपडेट ......

उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग यांचेकडून प्रायोगिक एकूण ५ गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे कामाची प्रगती खालीलप्रमाणे आहे.

तोरणमाळ, बिलमांजरे, असली गावांचे व्यवस्थापन आराखडे जिल्हास्तरीय समितीची मंजूरी घेण्यासाठी उप वन संरक्षक, नंदूरबार यांच्याकडे सादर करणेत आले आहेत.

यासंबंधात वनसंरक्षक धुळे कार्यालयात श्री पगार साहेब वन संरक्षक यांची भेट घेऊन त्यांना नंदुरबार वनविभागाकडे तीन गावांचे व्यवस्थापन आराखडे दिले असल्याबाबत अवगत करून ते मंजुरीबाबत उप वन संरक्षकांना कळविण्याबाबत पाठपुरावा केला. त्यांनी लगेच उप वनसंरक्षक यांना फोन लावून त्याबाबत अवगत केले असता, उप वन संरक्षकांनी सांगितले की इतर विभागांचे आराखडे न आल्यामुळे सध्या ती मीटिंग कलेक्टर साहेबांसोबत लावता येत नाही. त्यावर वन संरक्षकांनी उप वन संरक्षकांना संबंधित यंत्रणांची कलेक्टर त्यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन एका विशिष्ट मुदतीत आराखडे दिले नाही तर ते वगळण्यात येतील असे कळविण्याबाबत सुचविले.

### गाठी-भेटी

१०ऑक्टोबर रोजी वनसंरक्षक (प्रा) धुळे यांच्या कार्यालयात उप वन संरक्षक (वन्यजीव) श्री हिरे व उप वन संरक्षक जळगाव श्री. होशिंग यांची भेट झाली. त्यांच्याशी परिचय झाल्या नंतर सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ करीत असलेल्या कामाबाबत त्यांना अवगत केले त्यावर उवसं संरक्षक वन्यजीव श्री हिरे यांनी असे सांगितले की चंद्रपूर व नागपूर या वनवृत्तात मोठ्या प्रमाणात बांबू चा फुलोरा येण्यास आता सुरुवात होत असल्याने ते निष्कासनाचे आराखडे ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील आराखड्याप्रमाणे करावी लागतील असे अवगत केले. त्यावर त्यांना असे सांगितले की सेवक संघ ते करण्यास तयार आहे.

## अमरावती शाखा विशेष उपक्रम

### खरी विजयादशमी अमरावती शाखेने यांनी साजरी केली.

दसरा हा सण शमी वृक्षाची महती सांगतो. दाट सावली, लहान पाने ज्यामध्ये वस्तू लपवून ठेवली तर दुरून दिसणार नाही. पांडवांनी अज्ञातवासात शस्त्रे या वृक्षाचे छायेत लपवून ठेवली अशी अख्यायिका आहे. शस्त्रांचे संरक्षण करणाऱ्या वृक्षावर

बाबतही धोरण ठरवावे लागेल. अर्थात याचबरोबर त्यांच्या नैसर्गिक अधिवासातील मानवाचा हस्तक्षेप, अवलंबन मर्यादित करुन त्यांच्या अधिवासाचे प्रभावी संरक्षण आणि संवर्धन करणेही तितकेच महत्वाचे आहे. जेणेकरून जास्तीतजास्त बिबटे तेथे सुखनैवपणे जगू शकतील. राज्यात इतर ठिकाणी बिबटयां-साठी नैसर्गिक अधिवासांचा शोध घेऊन त्याचा विकास करण्याच्या दृष्टीने तत्काळ योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे. बंदिस्त बिबटयांसाठी राज्यात अनेक ठिकाणी बिबट निवारा केंद्रे उभारणे, आतापर्यंत मागे पडलेले बिबट सफारीसारखे पर्यटनाच्या दृष्टीने उपयुक्त प्रकल्प तातडीने कार्यान्वित करणे, जुन्नर सारख्येच राज्यात इंतर ठिकाणी बिबट प्रवण क्षेत्रात संशोधन प्रकल्प हाती घेणे. लोकांना प्रश्न समजावून सांगण्यासाठी वन विभागाच्या प्रसिद्धी विभागाचे बळकटीकरण करुन लोक प्रबोधनाचे काम मोठया प्रमाणावर करणे. नुकसान भरपाई विना विलंब देणे.इत्यादी अनेक बाबींचा धोरण ठरवतांना विचार करावा लागेल. महत्वाचे म्हणजे तोपर्यंत ही समस्या योग्य पध्दतीने हाताळण्या-साठी राज्यात अनेक ठिकाणी आवश्यक सोई सुविधा निर्माण करणे. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे गरजेचे आहे. असे प्रसंग हाताळणे ही एकटया वन विभागाची जबाबदारी नाही त्यासाठी सरकारचे सर्व संबंधित विभाग जसे महसूल,पोलीस,महा नगरपालिका, पशुधन विकास विभाग या सर्वांची जबाबदारी निश्चित करण्याची व त्या प्रमाणे त्या विभागाचे सक्षमीकरण तातडीने करण्याची गरज आहे. जागतिक दर्जाचे प्रसिध्द पर्यावरण तज्ज्ञ 'जॉर्ज शेलर' यांनी त्यांच्या पुणे भेटीत "If they are the problem, eradicate them!" असे ठाम मत व्यक्त केले होते.तर आमची संस्कृती ही निसर्गपूजक संस्कृती असल्याने अशा प्रकारे बिबटयांची समस्या सोडवणे आमच्या संस्कृतीत बसत नाही असे पुण्यातील पर्यावरण तज्ज्ञ कै. प्रकाश गोळे यांनी म्हटले होते.पण आजच्या बदलत्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मागे ठामपणे उभे राहणे गरजेचे आहे. हवामान बदलामुळे शेती धोक्यात आली आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यात बिबाटयामुळे त्याचे अधिक आर्थिक नुकसान होणार नाही, मनुष्य हानी होणार नाही याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.वर नमूद केल्या प्रमाणे योग्य धोरण आखून आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे हाच एक प्रभावी उपाय आहे. (समाप्त)




*संपू दे अंधार सारा*
*उजळू दे आकाश तारे*
*गंधाळल्या पहाटेस येथे*
*वाहू दे आनंद वारे....!*
*जाग यावी सृष्टीला की*
*होऊ दे माणूस जागा*
*भ्रष्ट सारे नष्ट व्हावे*
*घट्ट व्हावा प्रेम धागा...!*
*स्वच्छ सारे मार्ग व्हावे*
*अन् मने ही साफ व्हावी*
*मोकळ्या श्वासात येथे*
*जीवसृष्टी जन्म घ्यावी...!*
*स्पंदनांचा अर्थ येथे*
*एकमेकांना कळावा*
*ही सकाळ रोज यावी*
*माणसाचा देव व्हावा...!!*

दिपावलीच्या शुभेच्छा..!

चैतन्याचा पाऊस आणि
हर्षाचा फुलबाजा,
दिपवाळीचा सण म्हणजे
सर्व सणांचा राजा..!
संमृध्दीच्या कल्पतरुवर
बहार आनंदाची,
सुखात होवो परिपुर्णतः
तुमच्या मधु स्वप्नांची..!!

कवी- राजेंद्र जाधव, शिरपूर







केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी